**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक ०६ मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

1. **आगामी आर्थिक वर्षासाठी राज्याचा अर्थसंकल्प विधिमंडळात सादर/कृषी, रस्ते विकास, पर्यटन आदि क्षेत्रांसाठी विविध योजनांची घोषणा.**
2. **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेद्वारा शेतकऱ्यांना २ लाखापर्यंत कर्जमाफी जाहीर.**
3. **आसाममध्ये सुखोई विमान कोसळून झालेल्या अपघातात नागपूरचे वैमानिक पूर्वेश दुरुगकर यांच्यासह आणखी एका वैमानिकाचा मृत्यू.**
4. **दुसऱ्या वैदर्भीय आंबेडकरी महिला संमेलनाचं 8 मार्च रोजी यवतमाळ जिल्ह्यातील नेर इथं आयोजन.**

--------------------------------

अर्थसंकल्प

राज्याला २०४७ पर्यंत विकसित करण्याचं उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून तयार केलेला अर्थसंकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत सादर केला. यंदाचा अर्थसंकल्प हा आगामी वर्षाचा जमाखर्च नसून विकसित महाराष्ट्र २०४७ कडे जाणाऱ्या प्रवासाचा महत्त्वाचा टप्पा असल्याचं त्यांनी सांगितलं. यावेळी कृषी, रस्ते विकास, पर्यटन यासारख्या क्षेत्रासाठी त्यांनी आज विविध योजनांची घोषणा केली. तसंच विविध समाज सुधारकांच्या नावे विविध उपक्रम राबवणार असल्याचंही ते म्हणाले. यासाठी २०२६-२७ हे सामाजिक समता आणि समरसता वर्ष असेल, असं त्यांनी सांगितलं.

***ऐकुया याबाबत सविस्तर माहिती आमच्या प्रतिनिधींकडून -***

***३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत कर्ज असणाऱ्या शेतकऱ्यांना २ लाखापर्यंत कर्जमाफी देणारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना त्यांनी आज जाहीर केली. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत लाभ सरकार देणार आहे. २०४७ पर्यंत कृषी क्षेत्राचा जीडीपी ५५ अब्जवरून ५०० अब्ज डॉलरपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट राज्य सरकारनं ठेवलं आहे. कृषी क्षेत्रासाठीच्या विविध योजनांविषयी ते म्हणाले.***

*(होल्ड बाईट - मुख्यमंत्री)*

*एकूण ७ लाख ६९ हजार ४६७ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प देवेंद्र फडनवीस यांनी आज सादर केला. त्यात ६ लाख १६ हजार कोटी रुपयांहून अधिक महसुली जमा आणि ६ लाख ५६ हजारांहून अधिक महसुली खर्च अपेक्षित आहे. येत्या आर्थिक वर्षात राज्याची महसुली तूट ४० हजार ५५२ कोटी रुपये असेल. तर राजकोषीय तूट दीड लाख कोटींच्या वर जाईल, असा सरकारचा अंदाज आहे.मुख्यमंत्री मत्स्य संपदा योजनेची घोषणाही त्यांनी या अर्थसंकल्पात केली. याशिवाय मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या तिसऱ्या टप्प्यात २३ हजार किलोमीटर रस्ते तयार करण्याचं ते म्हणाले. मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद योजनेची घोषणाही त्यांनी केली. तसंच १ हजारापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांना कॉँक्रिटच्या रस्त्यांनी जोडण्याचा मानस त्यांनी जाहीर केला. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं भव्य स्मारक उभारण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी आज केली. त्यांच्या नावे गतीमान नागरिक सेवा पुरस्कार जाहीर करणार असल्याचंही फडनवीस म्हणाले. २०४७ पर्यंत उद्योग क्षेत्राचा जीडीपी १२३ अब्ज डॉलरवरुन १५०० अब्ज डॉलरपर्यंत वाढवण्याचं उद्दिष्ट राज्य सरकारनं ठेवलं आहे. प्रत्येक जिल्ह्यात MSME केंद्र स्थापन केलं जाणार असून MSME आणि सेवा क्षेत्रासाठी आयुक्तालयाची घोषणा मुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पात केली. आकांक्षित जिल्हा आणि तालुका योजनेचा विस्तार करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. एकूण १०० तालुक्यांवर सरकार विशेष लक्ष देणार आहे. नागपुरात महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य संस्था तर सातारा जिल्ह्यातल्या दरे गावात निसर्गोपचार केंद्र सुरू केलं जाणार आहे. प्रदूषण करणारी जुनी वाहन विकून नवीन वाहन विकत घेणाऱ्या नागरिकांना मोटार वाहन करात ३० टक्क्यांपर्यंत सवलत देण्याची घोषणाही त्यांनी या अर्थसंकल्पात केली. (आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी नम्रता फलके)*

---------------------------------

प्रतिक्रिया-विरोधी पक्ष

राज्य सरकारने सादर केलेला अर्थसंकल्प हा महाराष्ट्राचा नसून उद्योगपती आणि कंत्राटदारांच्या भल्यासाठी मांडलेला MMRDAचा अर्थसंकल्प असल्याची उपरोधिक टीका विधानसभेतील काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. हा अर्थसंकल्प २०२६ चा आहे की २०४७ चा, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. मुंबई, पुणे व ठाणे येथील प्रकल्पांवरच भर देत ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप करताना त्यांनी सिंचन, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात

ठोस तरतुदी नसल्याचे सांगितल. शेतकऱ्यांसाठी सरसकट कर्जमाफीची घोषणा न केल्याबद्दलही त्यांनी नाराजी व्यक्त केली. या अर्थसंकल्पात विदर्भ आणि मराठवाड्याच्या विकासाबाबत कोणतीही ठोस तरतूद नसल्याची टीका काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री आमदार डॉ. नितीन राऊत यांनी केली. मिहान प्रकल्पाबाबतही रोजगारनिर्मितीचा स्पष्ट आराखडा नसल्याचा आरोप करताना त्यांनी शेतकरी, विद्यार्थी आणि मागासवर्गीय घटकांसाठी पुरेसा निधी नसल्याच म्हटल आहे. राज्याच्या उत्पन्नातील मोठा हिस्सा कर्जाच्या व्याजासाठी खर्च होत असून हा अर्थसंकल्प राज्याला आर्थिक संकटाकडे नेणारा असल्याची टीकाही डॉ. राऊत यांनी केली.

--------------------------------

अग्नीविर

अग्नीविरांच्या सैन्य दलातील निवृत्तीनंतर त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासंदर्भात स्थापन करण्यात आलेल्या समितीचा अहवाल आल्यानंतर याबाबत निर्णय घेतला जाईल, असं मंत्री शंभुराज देसाई यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. २०२२ ते २४ या कालावधीत सैन्य दलात भरती झालेल्या अकरा हजार अग्निवीरांपैकी आठ हजार २५० अग्निवीर निवृत्त होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

--------------------------------

सुखोई-३० एमकेआय

आसाममध्ये काल सुखोई- 30 MKI लढाऊ विमान कोसळल्यानं झालेल्या अपघातात दोन वैमानिकांचा मृत्यू झाला. स्वाड्रन लीडर अनुज आणि फ्लाइट लेफ्टनंट पुर्वेश दुरुगकर अशी या वैमानिकांची नावं आहे. जोरहाट इथल्या भारतीय हवाई दलाच्या तळावरून काल नियमित प्रशिक्षणासाठी निघालेलं हे विमान कार्बी आंगलोंग जिल्ह्यातल्या एका टेकडीवर कोसळलं. रात्री सुमारे पावणे सात वाजता विमानाशी शेवटचा संपर्क झाला होता. फ्लाइट लेफ़्टनंट पुर्वेश दुरुगकर हे नागपूर जिल्ह्यातले रहिवासी होते. त्यांनी DSA अकादमी, शहापूर जिल्हा भंडारा येथे शिक्षण घेतल होत. त्यांनी AFCAT परीक्षा उत्तीर्ण करून २०२१ मध्ये एअर फोर्स अकॅडमीत प्रवेश घेतला होता. यापूर्वी वायुसेनेच्या ‘ऑपरेशन सिंदूर’ मध्येही महत्त्वाची भूमिका बजावत देशाच्या संरक्षणासाठी त्यांनी योगदान दिल होतं. त्यांच्या निधनाबद्दल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत.

---------------------------------

माजी सैनिक सम्मान रॅली

भारतीय सैन्याच्या वतीने मुख्यालय उत्तर महाराष्ट्र आणि गुजरात सब एरिया यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ८ मार्च रोजी 'व्हेटरन्स सन्मान संपर्क रॅली' आयोजित करण्यात आली आहे.

***(होल्ड बाईट - प्रोमो - ३० सेकंद)***

या रॅलीमध्ये नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती आणि वर्धा जिल्ह्यातील माजी सैनिक सहभागी होणार आहेत. माजी सैनिकांच्या तक्रारी जाणून घेणे तसेच सैन्य दल आणि केंद्र-राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

---------------------------------

२रे वैदर्भीय आंबेडकरी महिला संमेलन

रविवार दिनांक 8 मार्च रोजी यवतमाळ जिल्ह्यातील नेर इथं दुसऱ्या वैदर्भीय आंबेडकरी महिला संमेलनाचं आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राध्यापक डॉक्टर रेखा मेश्राम असतील तर उद्घाटन दलित पँथरचे संस्थापक सदस्य ज.वि.पवार यांच्या हस्ते होईल. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान केला जाणार आहे. परिसंवाद आणि कवी संमेलन आदी कार्यक्रमांचं देखील आयोजन यावेळी करण्यात येणार आहे.

---------------------------------

हवामान

गेल्या 24 तासात अमरावती जिल्ह्यात उचांकी 39 पूर्णांक 8 दशांश अंश सेल्सिअस इतक कमाल तापमान नोंदवण्यात आलं असून विदर्भात अमरावती जिल्हा सर्वात उष्ण ठरला आहे. दरम्यान अकोला आणि वर्धा जिल्ह्यात देखील 39 अंश सेल्सिअसच्या घरात कमाल तापमान आहे. त्या पाठोपाठ वाशिम इथं 38. 4, चंद्रपूर इथं 38. 5 तर नागपूर आणि भंडारा या जिल्ह्यांमध्ये तापमान 37°c च्या घरात आहे. मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच तापमान 40°c च्या नजीक असल्याने दुपारच्या सुमारास उन्हाची तीव्रता अधिक जाणवते आहे.

---------------------------------

अन्नत्याग सत्याग्रह आंदोलन

चंद्रपूर जिल्ह्यात वाघ-मानव संघर्ष निवारणाच्या प्रलंबित मागण्यांसह ताडोबाच्या कॉरिडॉर मध्ये प्रस्तावित लोहार डोंगरी लोह खाण प्रकल्पाची वन्यजीव विषयक

परवानगी नाकारण्यात यावी, याकरिता चंद्रपूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर इको प्रो संघटनेचे अध्यक्ष बंडू धोतरे यांनी अन्नत्याग सत्याग्रह आंदोलन सुरू केले आहे. अन्नत्याग आंदोलनाच्या पहिल्या दिवशी आंदोलनस्थळी नागरिकांनी भेट देत या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे.

---------------------------------